स्मरणपत्र-३

जा.क्र. राज्य योजना/1010 /२०१८
राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण,
सिडको भवन, ४ था मजला, दक्षिण कक्ष
बेलापूर, नवी मुंबई.
दि. २६.०६.२०१८

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद (सर्व), जळगांव, वर्धा, सातारा, अहमदनगर, नंदुरबार,
परभणी, रत्नागिरी, नागपूर, हिंगोली, सोलापूर, नाशिक, पुणे वगळून

विषय : पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत.

संदर्भ : १) अवर सचिव, ग्राम विकास विभाग यांचेकडील पत्र क्र. प्रआयो-२०१८/प्र.क्र.७२/योजना-१० दिनांक ०९ फेब्रुवारी, २०१८

२) या कार्यालयाकडील पत्र जा. क्र. राज्य योजना/१०४९/२०१८, दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८

३) या कार्यालयाकडील स्मरण पत्र १ जा. क्र. राज्य योजना/१२२०/२०१८, दिनांक ०१.०३.२०१८

४) या कार्यालयाकडील स्मरण पत्र २ जा. क्र. राज्य योजना/८९/२०१८ दि. १८.०४.२०१८

महोदय,

उपरोक्त संदर्भ क्र. २ अन्वये, पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मा. पालकमंत्री यांना मा. मंत्री (ग्रामविकास) यांच्या स्वाक्षरीने पत्र देणेकरीता आवश्यक असलेली आपल्या जिल्हयातील घरकुलास पात्र असलेंल्या लाभार्थ्यांची व जागा नसलेल्या लाभार्थ्यांची संख्या व प्रमाणपत्र विहित नमुन्यात या कार्यालयाकडून मागविण्यात आलेले होते.

परंतु माहिती अप्राप्त असल्याने संदर्भ क्र. ३ व ४ अन्वये स्मरणपत्र देखील निर्गमित करण्यात आलेले आहे. परंतु सदरची माहिती अदयापही या कार्यालयास अप्राप्त आहे. ही माहिती योजनेचे सन २०१८-१९ चे उद्दिष्ट वाटप करण्याकरीता आवश्यक असल्याने तात्काळ या कार्यालयास सादर करावी, ही विनंती.

26/6/2018
धनंजय माळी (भा.रा.से.)
संचालक,
राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण,
महाराष्ट्र राज्य

प्रत :

१) उपायुक्त (विकास) विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व), यांनी सदरील माहिती तात्काळ मिळणेसाठी आपले स्तरावरुन योग्य तो पाठपुरावा करावा.

२) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, (सर्व) जळगांव, वर्धा, सातारा, अहमदनगर, नंदुरबार, परभणी, रत्नागिरी, नागपूर, हिंगोली, सोलापूर, नाशिक, पुणे वगळून यांना पुढील कार्यवाहीसाठी

३) कक्ष अधिकारी, (योजना-१०) ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई यांना माहितीस्तव.

C:\Users\hp\Downloads\PDU प्रमाणपत्र 1 2 Letter.docx